MHKO140007892025

**म.स.कौ.हिं.का.अर्ज क्रं.२५/२०२५ मधील नि.क्र.०५ खालील**

**आदेश**

नसिमा मुशरान हाकीम

**वि.**

मुशरान युसूफ हाकीम वगैरे.

प्रस्तुत अर्ज अर्जदार हिने कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार गैरअर्जदार यांचेकडून अंतरीम पोटगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदार यांना पुरेशी संधी असुनही त्यांनी हजर होवून अर्जास हरकत नोंदविली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

०२. अर्जदार यांच्यातर्फे विधीज्ञ श्रीमती बी. जी. कांबळे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दस्ताऐवज पाहिले. अर्जदारतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवादावेळी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती करण्यात आली.

०३. अर्जदार यांच्या कथनावरुन तसेच करण्यात आलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे उपस्थित होत असून मी, त्यास सकारण खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार यांचा गैरअर्जदार यांनी "कौटुंबिक हिंसाचार" केला हे अर्जदाराने प्रथमदर्शनी सिद्ध केले काय? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार क्र.१ ते ३ हे गैरअर्जदार क्र.०१ यांचे कडुन दरमहा रक्कम | |

| | | |
|---|---|---|
| | रुपये १५,०००/– अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | **अंशत: होकारार्थी.** |
| ०३. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.** |

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>मुद्दा क्रमांक ०१ बाबत</u> :**

०४. अर्जदार यांनी मुळ अर्जामध्ये तिच्या सोबत झालेल्या छळाचे सविस्तर कथन केले आहे. कोणतीही भारतीय स्त्री विना कारण तिचे वैवाहिक जिवन ठोकरुन तिचा पती अथवा माहेरच्या लोकांवर आरोप करणार नाही. अर्जदार यांचे कथन नैसर्गिक असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार हिने तिच्या छळाच्या अर्जामध्ये नमुद केलेले कारण प्रथम दर्शनी व या टप्प्यावर तरी खरे दिसुन येत आहे. सखोल पुराव्यानंतरच ते कारण खोटे आहे किंवा कसे हे ठरविले जावू शकते. गैरअर्जदार यांना पुरेशी संधी उपलब्ध असुनही त्यांनी हजर होवून अर्ज आव्हानीत केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांच्या अर्जातील कथने विना आव्हानीत राहिलेली आहेत. त्यामुळे सदर कथने आहे तशी गैरअर्जदार यांच्याविरुध्द विचारात घेता येतील. सबब, अर्जदार यांचा गैरअर्जदार यांनी "कौटुंबिक हिंसाचार" केला हे अर्जदाराने प्रथमदर्शनी सिद्ध केले आहे.

**सबब, मी, मुद्दा क्रमांक ०१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्रमांक ०२ करीता</u> :–**

०५. मी, मुद्दा क्रमांक ०१ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदविला आहे. अर्जदार यांचा गैरअर्जदार यांनी "कौटुंबिक हिंसाचार" केल्याचे तिने प्रथमदर्शनी सिद्ध केले आहे. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ हा गवंडी व सेंट्रींग कामाचा व्यवसाय करत असुन मोठमोठी

बांधकाम घेत असुन त्यास दरमहा ५० ते ६० हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. तसेच मौजे आजरा येथे बागायत प्रतिची आडीच एकर शेती आहे. सदर शेतीपासुन त्यांना रु.३,००,०००/– इतके वार्षिक उत्पन्न मिळते. गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असुन त्यांच्यावर अर्जदार क्र.१ ते ३ यांचेशिवाय अन्य कोणीही अवलंबुन नाही. आर्थिक परिस्थिती चांगली व सधन असताना देखील गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचे दैनंदिन गरजा, कापडलत्ता, औषध–पाणी व निवा–याची कोणतीही व्यवस्था केली नाही.

०६. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी दरमहा रु.१५,०००/– इतकी अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या तीन मुलभुत गरजा आहेत, हे त्रिकालबाधीत सत्य आहे. मुळ अर्ज पुरावा घेवून गुणदोषांवर चालुन न्यायनिर्णय होण्यास कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदारतर्फे उत्पन्नाबाबतचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. गैरअर्जदार याचे उत्पन्न हे त्याच्या वैयक्तिक ज्ञानातील बाब आहे. अंतरीम पोटगीची रक्कम ठरवताना जर उत्पन्नाबाबत स्पष्ट पुरावा अभिलेखावर दाखल नसल्यास दोन्ही पक्षकारांचे राहणीमान, वाढती महागाई, अन्न–वस्त्र व निवारा या सारख्या मुलभुत गरजा, पालनपोषणाचा खर्च, औषधोपचार, शिक्षणाचा खर्च यासर्व बाबीं विचारात घेणे गरजेचे आहे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र.२ व ३ हे गैरअर्जदार क्र.१ यांची मुले आहेत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी ही गैरअर्जदार यांची आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ हे गैरअर्जदार यांचे कडुन अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

०७. सद्य स्थितीत गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडे कमवण्याचे कौशल्य असल्याचे दिसुन येते. तसेच शेती असे दुहेरी उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसत आहे. गैरअर्जदार यांनी अर्ज आव्हानीत केला नसल्याने अर्जातील कथने मान्य आहेत व प्रस्तुतच्या अर्जास हरकत घेण्यास स्वारस्य नसल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार यांना कोणत्याही कायदेशीर कारणाशिवाय सदर जबाबदारी झटकता येणार नाही. सर्व सामान्य जीवन जगण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ३ यांना प्रत्येकी दररोज आहार व इतर जीवनावश्यक सुखसोई, औषधोपचार, कपडे लत्ता व निवारा या करीता अंदाजे दररोज प्रत्येकी १०० ते १५० रुपये खर्च येत असेल असा अंदाज आकाशाला भिडणा–या महागाई वरुन व दैनंदिन परिस्थिती वरुन काढता येईल. म्हणून अर्जदार क्र.१ ते ३ यांना गैरअर्जदार क्र.१ यांचे कडुन दरमहा रक्कम रुपये ९,०००/– (नऊ हजार मात्र) अंतरिम पोटगी म्हणुन मिळणेस पात्र आहे. वरिल विवेचनार्थ मी, मुद्दा क्रमांक ०२ करीता अंशत: होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ०३ बाबत :–**

०८. मी, उपरोक्त मुद्दांना नोंदवलेल्या निष्कर्षावरुन अर्ज अंशत: मंजुर होणेस पात्र आहे. अर्जदार ही मुळ अर्ज दाखल दिनांका पासुन अंतरिम पोटगी आदेशाची बजावणी होऊन मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी, मुद्दा क्रमांक ०३ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**:: आदेश ::**

०१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

०२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्ज दाखल दिनांकापासुन मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत प्रती महिना रक्कम रुपये ९,०००/-(**रक्कम रुपये नऊ हजार मात्र**) अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार यांना द्यावेत.

०३. सदरहु आदेशाची प्रत उभयपक्षकार यांना मोफत देण्यात यावी. तसेच सरंक्षण अधिकारी व संबंधीत पोलिस स्टेशन यांना पुरविण्यात यावी.

**(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

ASHATAI NARAYAN SARAK Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK Date: 2026.07.21 17:54:43 +0530

**ठिकाण: चंदगड** **(ए. एन. सरक)**

**दिनांक: २१.०७.२०२६** **प्रभारी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड.**